क्र. ११६ तिसरे वर्ष

२० नोव्हेंबर २०२२

# रविवारची  उपासना

## ख्रिस्त राजाचा सण

### प्रस्तावना

ख्रिस्तराजाच्या अतिपवित्र मिसाबलिदानासाठी जमलेल्या आपणा सर्व प्रजाजनांचे हार्दिक स्वागत. आज आपण ख्रिस्तराजाचा सण साजरा करीत आहोत. प्रभुचा राजाधिकार जाहीर करून तो आमचा राजा आहे याची ग्वाही आम्ही जगभर देत आहोत. त्यांनी आमच्यासाठी दु:ख व यातना सहन करून वधस्तंभावर मरण स्वीकारले. सत्याचा, दयेचा व शांतीचा मार्ग दाखवून प्रेमाचे व न्यायाचे राज्य प्रस्थापित केले. आमच्या पापरूपी अंध:कारात कृपेची व प्रकाशाची ज्योत प्रज्वलीत केली. आज मोठ्या भक्तीभावाने व आनंदाने ख्रिस्तराजाचे दर्शन घेण्यासाठी व त्याचा महिमा गाण्यासाठी या मिस्साबलिदानात सहभागी होऊ या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करू या.**

हे प्रभो, तुझ्या इच्छेप्रमाणे वागण्यास आम्हाला अधिक उत्सुक कर. तुझ्या प्रेमाचे तारणदायी सामर्थ्य जाणण्यास आम्हाला साहाय्य कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

### पहिले वाचन

**शमुवेलाच्या दुसऱ्या पुस्तकातून घेतलेले वाचन ५:१-३**

**''त्यांनी दाविदला अभिषेक करून इस्राएलवर राजा नेमले.''**

कारे इस्राएलचे सर्व वडीलजन हेब्रोनात राजाकडे आले आणि दाविद राजाने त्यांच्याशी हेब्रोनात परमेश्वरासमोर करार केला आणि त्यांनी दाविदला अभिषेक करून इस्राएलवर राजा केले.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**१२१:१-२,३-४, ४अ,४ब-५**

प्रतिसाद : **''आपण परमेश्वराच्या घराकडे जाऊ''**

१. ''आपण परमेश्वराच्या घराकडे जाऊ.''
असे ते म्हणाले, तेव्हा मला आनंद झाला.
हे यरुशलेम, तुझ्या वेशींना आमचे पाय
लागले आहेत. (प्र.)

२. हे यरुशलेम, एकत्र जोडलेल्या
नगरीसारखी तू बांधलेली आहेस.
तुझ्याकडे वंश, परमेश्वराचे वंश,
परमेश्वराच्या नामाचे उपकारस्मरण
करण्यासाठी चढून येतात. (प्र.)

३. इस्राएलला लावून दिलेल्या निर्बंधाप्रमाणे
परमेश्वराच्या नामाचे उपकारस्मरण
करण्यासाठी चढून येतात.
कारण तेथे न्यायासने, दाविदच्या
घराण्याची राजासने मांडली
आहेत. (प्र.)

### दुसरे वाचन

**संत पौलने कलस्सैकरांस पाठवलेल्या पत्रातून घेतलेले वाचन १:११–२०**

**''देवाने आपल्याला आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यात आणून ठेवले आहे.''**

ज्याने तुम्हांला प्रकाशातील पवित्र जनांच्या वतनाचे विभागी होण्याजोगे केले त्या पित्याची आम्ही उपकारस्तुती करतो. त्याने आपल्याला अंधाराच्या सत्तेतून काढून आपल्या प्रिय पुत्राच्या राज्यात आणून ठेवले. त्या पुत्राच्याठायी, खंडणी भरून प्राप्त केलेली मुक्ती म्हणजे आपल्या पापांची क्षमा आपल्याला मिळाली आहे.

तो अदृश्य देवाचे प्रतिरुप आहे. तो सर्व उत्पत्तीत ज्येष्ठ आहे. कारण आकाशात आणि पृथ्वीवर असलेले, दृश्य आणि अदृश्य असलेले राजे, अधिपती, सत्ताधीश किंवा अधिकारी असलेले, जे काही आहे ते सर्व त्याच्यामध्ये निर्माण झाले, सर्व काही त्याच्याद्वारे आणि त्याच्यासाठी निर्माण झाले आहे. तो सर्वांच्या पूर्वीचा आणि त्याच्यामध्ये सर्व काही अस्तित्वात आहे. तोच शरीराचे म्हणजे मंडळीचे मस्तक आहे. तो आदी, मृतातून प्रथम जन्मलेला आहे, अशासाठी की, सर्वांमध्ये त्याला प्राधान्य मिळावे, कारण त्याच्याठायी सर्व पूर्णता वसावी आणि त्याच्या क्रूसावरील रक्ताच्याद्वारे शांती निर्माण करून त्याच्याद्वारे जे सर्वकाही आहे ते सर्व, ते पृथ्वीवरील असो किंवा स्वर्गातील असो, त्याचा स्वत:बरोबर त्याच्याद्वारे समेट करावा हे पित्याला बरे वाटते.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**मार्क ११:९–१०**

**आलेलुया, आलेलुया!**

प्रभूच्या नामाने येत आहे तो धन्य.

आमचा पूर्वज दाविद ह्याचे राज्य सुवंदित असो.

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**संत लूकच्या शुभवर्तमानातून घेतलेले वाचन २३:३५–४०**

**''अहो येशू, आपण आपल्या राजाधिकाराने याल तेव्हा माझी आठवण करा.''**

लोक पाहत उभे होते, पण अधिकारी थट्टा करत म्हणाले, ''त्याने दुसऱ्यांना वाचवले, जर तो देवाचा ख्रिस्त, त्याचा निवडलेला असला तर त्याने स्वत:स वाचवावे.'' शिपायांनी जवळ येऊन आंब त्याच्यापुढे धरुन, त्याची अशी थट्टा केली की, ''तू यहूद्यांचा राजा असलास तर स्वत:ला वाचव.'' ''हा यहूद्यांचा राजा आहे'' अशी पाटीही त्याच्यावरच्या बाजूस होती.

क्रूसावर खिळलेल्या त्या अपराध्यांपैकी एकाने त्याची निंदा करून म्हटले, ''तू ख्रिस्त आहेस ना? तर स्वत:ला आणि आम्हांला वाचव.'' परंतु दुसऱ्याने त्याचा निषेध करुन म्हटले, ''तुलाही तीच शिक्षा झाली

असता तू देवालासुध्दा भीत नाहीस काय? आपली शिक्षा तर यथान्याय आहे, कारण आपण आपल्या कृत्यांचे योग्य फळ भोगत आहो, परंतु ह्याने काही अयोग्य केले नाही.'' मग तो म्हणाला, ''अहो येशू, आपण आपल्या राजाधिकाराने याल तेव्हा माझी आठवण करा.'' तो त्याला म्हणाला, ''मी तुला नक्की सांगतो, तू आज माझ्याबरोबर सुखलोकात असशील.''

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक**

बंधू आणि भगिनींनो आज ख्रिस्तसभा प्रभू येशूचा विश्वाचा राजा म्हणून यथोचित सन्मान करीत आहे. ख्रिस्त जसा विश्वाचा राजा आहे तसेच तो आपल्या अंत:करणाचाही राजा आहे. मोठ्या भक्तीभावाने त्याचे दर्शन घेण्यासाठी व त्याचा महिमा गाण्यासाठी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या व त्याच्याठायी आपल्या विनंत्या ठेवू या.

**प्रतिसाद गायनात :** करदानाचा वर्षाव देवा (राजा) वर दानांचा वर्षाव।

१। आपण आपले रोजचे जीवन जगत असताना शारीरिक भूक भागविण्यासाठी धडपडतो. तशाच प्रकारे आपण आपली आध्यात्मिक भूक भागविण्यासाठी धडपडावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

२। आपले राज्य या जगाचे नाही कारण आपण येथील रहिवासी नसून प्रवासी आहोत. याची जाणीव प्रत्येकामध्ये असावी म्हणून आपण प्रामाणिकपणे व सत्याने आचरण करावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३। समाजात बरीच लोकं अनिष्ट मार्गाने पैसे मिळवून भ्रष्टाचार करत असतात अशा लोकांना भाकरीतील ख्रिस्ताचे महत्त्व कळावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४। भाकरीतील ख्रिस्तापासून प्रेरणा घेऊन जे गरीब, गरजवंत लोकांची भूक भागविण्यासाठी झटत असतात त्यांना चांगले आरोग्य व परमेश्वराची कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

५। जे ख्रिस्तापासून दूर आहेत त्यांना ख्रिस्ताचा स्पर्श व्हावा म्हणून आपण त्यांच्यासाठी प्रार्थना करू या.

६। थोडावेळ शांत राहून आपल्या वैयक्तिक हेतूसाठी प्रार्थना करू या...

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रेमस्वरूप परमेश्वरा, तुझ्या आज्ञेनुसार आम्ही हे समर्पण तुला अर्पण करीत आहोत. ह्या समर्पणाद्वारे तुझ्या शब्दांशी एकनिष्ठ राहण्याचा आमचा निश्चय दृढ कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे सर्वसमर्थ परमेश्वरा, ह्या ख्रिस्तप्रसादाद्वारे तू आम्हांला तुझ्या जीवनात सहभागी होण्याचे भाग्य देतोस. आम्हांला सदैव तुझ्या सान्निध्यात ठेव. तुझ्यापासून आमचा कधीही वियोग होऊ देऊ नकोस. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## चिंतन

बायबलच्या शिकवणुकीनुसार परमेश्वर हा स्वर्ग आणि पृथ्वी ह्यांचा सर्वेसर्वा सम्राट आहे. पृथ्वीतलावरील राजांचे जीवन पाहून इस्राएली लोकांनी परमेश्वर एक राजा म्हणून आपले पालन पोषण व संरक्षण कसे करतो त्याविषयी आपला अनुभव बायबलमध्ये कथन केलेला आहे. जन्म व मृत्यू अशा दोन्ही टोकांवर 'यहुद्यांचा राजा' म्हणून ज्याची निर्भत्सना करण्यात आली त्या नाझरेथकर येशूचा हा सोहळा साजरा करीत असताना ख्रिस्तसभा आपल्यासमोर तीन चिंतने सादर करते :

**अ) देवाचे राज्य हे सार्वकालिक स्वरूपाचे आहे :** शौल हा इस्राएलचा पहिला राजा होता. मत्सरापोटी त्याला आपले राज्य गमवावे लागले. पुढे त्याच्या जागी दाविद राजा राज्य करू लागला. आजचे पहिले वाचन (२ शमुवेल ५:१-३) दाविदच्या राज्यपदी झालेल्या नेमणुकीचे वर्णन करते. त्याआधी शमुवेलने दाविदचा अभिषेक केलेला होता. ह्याच दाविदच्या राज्याचा अंत होणार नाही असे भाकित जुन्या करारात करण्यात आले आणि दाविद पुत्र येशू ह्याच्याठायी ते पूर्णत्वास गेले.

**ब) एक राजा म्हणून परमेश्वर सर्वव्यापी, सर्वसमर्थ व सर्वज्ञानी आहे :** आजच्या दुसऱ्या वाचनात (कलस्सै. १:१२०२०) प्रभू येशू ख्रिस्ताच्या पृथ्वीवरील जीवनाआधी तो युगाच्या प्रारंभापासून अस्तित्वात होता हे सत्य अधोरेखित करण्यात आलेले आहे.

**क) देवाचे राज्य पृथ्वीवरील दु:खे आणि स्वर्गातील सुखे अशा दोन्हीवर नियंत्रण ठेवणारे आहे :** आजच्या शभवर्तमानात (लूक २३:३५-४३) पृथ्वीवरील दु:खे भोगणारा येशू उजव्या हाताकडील चोराला स्वर्गाचे सुख प्रदान करतो.

**आत्मपरीक्षण :** परमेश्वर कोणकोणत्या रूपाने माझ्या जीवनात राज्य करतो? मी त्याचा राजाधिकार पूर्ण मनाने स्वीकारलेला आहे का?

●●●

| नोव्हेंबर/डिसेंबर २०२२ | | दैनंदिन बायबल वाचने | पहिला सप्ताह |
|---|---|---|---|
| सोम २१ | धन्य कु. म. मंदिरात समर्पण (पां) : | प्रकटी.१४:१-५/लूक २१:१-४ | |
| मंगळ २२ | सं सिसिलिया (तां): | प्रकटीकरण १४:१४-१९/लूक २१:५-११ | |
| बुध २३ | सं क्लेमेंट पहिले (तां) : | प्रकटीकरण १५:१-४/लूक २१:१२-१९ | |
| गुरु २४ | सं ॲन्ड्रयु आणि सहकारी (हि/तां) : | प्रकटीकरण १८:१-९/लूक २१:२०-२८ | |
| शुक्र २५ | अलेक्झांड्रियाची सं. कॅथरीन (हि/तां): | प्रकटीकरण २०:१-११/मत्तय २१:२१-३३ | |
| शनि २६ | पोर्ट मॉरीसचे सं. लिओनार्ड (हि) : | प्रकटीकरण २२:१-७/लूक २१:३४-३६ | |

**डॉन बॉस्को युथ सेंटर**
सलेशियन कॅटकॅटिकल सेंटर
कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१
मो. ९९७५९४०६७२

**त्या प्रकाशाविषयी साक्ष देण्याकरिता**
**(योहान १:८)**
चिंतन : फा. रॉबर्ट डिसोझा वसई
(खाजगी वितरणासाठी)